दिनांक 18/5/26

सभासद बंधू भगिनींनो,

आज आपल्या सोसायटी च्या पुनर्निर्माण प्रकल्पात आत्ता पर्यंत झालेले काम ची तसेच पुढील वाटचाल ह्या वर एक रिव्ह्यू मीटिंग संस्थे चे प्रकल्प आणि विधी सल्लागार आणि बिल्डर चे प्रतिनिधी श्री माहेश्वरी यांच्या सोबत झाली. ह्यात ज्या प्रमुख मुद्द्यांवर निर्णय घेण्यात आला ते खालील प्रमाणे -

1. संस्थे कडे सभासदांच्या Allotment Letters च्या ड्राफ्ट कॉपीज आल्या आहेत. त्या चेक करून उद्या बिल्डर कडे परत पाठवणार आहोत. पुढील दोन चार दिवसात ड्राफ्ट आपल्याला परत मिळतील अशी अपेक्षा आहे जेणे करून येत्या 23 तारखे पासून ते Allotment Letters सभासदांना देण्यास सुरुवात होईल

2. सभासदांनी 10/5/26 च्या विशेष सर्वसाधारण सभेत ठरल्या प्रमाणे फ्लॅट्स / डुप्लेक्स चा ताबा येत्या 31 मे पर्यंत सोसायटी कडे द्यायचा आहे.

3. कोर्ट केस केलेले तीन सभासद सोडून बाकी सभासदांच्या फ्लॅट्स / डुप्लेक्स चा ताबा मिळाल्याची सूचना सोसायटी कडून मिळताच ठरल्या प्रमाणे बिल्डर 1 जून, 26 पासून घरभाडे देणार.

4. जर काही सभासद त्यांच्या फ्लॅट्स / डुप्लेक्स चा ताबा निर्धारित दिवसापर्यंय देऊ शकले नाहीत तर, 10/5/26 च्या विशेष सर्वसाधारण सभेत ठरल्या प्रमाणे, त्यांच्या वर कायदेशीर कार्यवाही सुरू करण्यात येईल.

5. पुढील चार दिवसात बिल्डर कडून shifting charges चे रु. 25000/- सभासदांच्या बँक खात्यात जमा करण्यात येतील.

6. Refundable Deposit ची रु. 250/- प्रति वर्ग फूट ही रक्कम ही लवकरच सभासदांना देण्यात येईल.

7. घरांचा ताबा देण्या आधी काही बाबींची पूर्तता सभासदांनी करायची आहे जसे ह्या महिन्या शेवट पर्यंत चे विजेची बिल,व सहा महिन्याचा प्रॉपर्टी टॅक्स भरावयाचा आहे.आपला नवीन पत्ता पण संस्थेला कळवायचाआहे. सर्वाची पत्रे का ॅमन पेटीत जमा करुन कुरीयरने सर्वाना महिन्यातुन एकदा पाठविली जातील .

पंच समिती च्या वती ने